# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**(पुर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)**

## परिपत्रक क्र. १७१/२०२०

**विषय :** उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र / वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाहीबाबत...

**संदर्भ :** १) यु.जी.सी., मार्गदर्शक सूचना पत्र क्र.डी.डी.नं.एफ-१/२०२० (सचिव), दि. २९ एप्रिल, २०२०.

२) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. युएनआय/२०२०/बैठक/विशि-१/४१३१ A, दि. ८ मे, २०२०.

३) वि.प. ठराव क्र. वि.प.०१/२०२०, दि. २८.०५.२०२०.

४) परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. ०९.०६.२०२० रोजीच्या सभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावांनुसार.

**प्रस्तावना :**

कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) च्या प्रादुर्भावामुळे  व तद्अनुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरीता मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी गठित केलेल्या राज्यस्तरिय समितीच्या अहवालामधील शिफारशी महाराष्ट्र शासनाने स्वीकृत केलेल्या असून, याबाबत संदर्भीय क्र. २ अन्वये अहवालातील शिफारसींच्या अनुषंगाने उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र / वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाहीबाबत कळविण्यात आलेल्या बाबींचा विचार करता इतर परीक्षांच्या निकालाची प्रक्रिया विद्यापीठाने सुरू केलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत या संदर्भात विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने उपरोक्त अहवालात नमूद केलेल्या बाबींचे सहज व सुलभ आकलन होण्यासाठी सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. यासंबंधी काही अडचणी असल्यास महाविद्यालयातील कर्मचारी विद्यापीठातील परीक्षा विभागात संपर्क साधू शकतील. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठ प्रशाळा, शैक्षणिक विभाग, संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्थामध्ये प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षा २०२० मधील अंतिम सत्र / वर्ष वगळून इतर परीक्षांच्या निकालाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे निर्णय कळविण्यात येत आहे.

**निर्णय :**

**अ) विद्यार्थ्यांना परीक्षा व शैक्षणिक विषयक मार्गदर्शन व शंकांचे निरसन करण्यासाठी निरसन कक्षांची स्थापना करण्याबाबत:**

१) उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रामधील मुद्दा क्र. ८ नुसार कोव्हीड-१९ च्या उद्रेकामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा आणि त्यांच्या शैक्षणिक हितासाठी मार्गदर्शन मिळावे यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/७-अ/१६३१/२०२०, दि. ०९.०५.२०२० अन्वये स्थापन करण्यात आलेला असून हेल्पलाईन सुध्दा सुरू करण्यात आली आहे. या कक्षाव्दारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सहाय्य मिळणेसाठी समुपदेशनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. या कक्षाच्या संपर्कासाठी ईमेल आय डी covid19helpdesk@nmu.ac.in तसेच हेल्पलाईन नंबर ०२५७-२२५८४११ देण्यात आलेला आहे.

२) उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रामधील शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमधील/परिसंस्थांमधील विद्यार्थ्यांना उद्भवणाऱ्या शंकाचे निरसन करण्यासाठी व परीक्षा विषयक मार्गदर्शन करण्यासाठी एकूण २७ विविध महाविद्यालयांमध्ये विद्यापीठाचे जा.क्र. कबचौउमवि/ ७-अ/१६३७/२०२०, दि. १३.०५.२०२० नुसार विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष आणि हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे. या कक्षांव्दारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सहाय्य मिळणेसाठी समुपदेशनाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**आ) पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळून सत्र पध्दतीमधील इतर विद्यार्थ्यांच्या परीक्षांबाबत:**

१) पदवीच्या ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या व्दितीय व व्दितीय वर्षाच्या चतुर्थ सत्राची परीक्षा होणार नाही. तसेच पदवीच्या ४ वर्षाच्या कलावधीच्या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या व्दितीय, व्दितीय वर्षाच्या चतुर्थ व तृतीय वर्षाच्या सहाव्या सत्राची परीक्षा होणार नाही.

२) पदव्युत्तर २ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षाच्या व्दितीय सत्राची परीक्षा होणार नाही.

३) ५ वर्षाच्या एकात्मिक (Integrated) अभ्याक्रमाच्या प्रथम वर्षाच्या व्दितीय, व्दितीय वर्षाच्या चतुर्थ आणि चतुर्थ वर्षाच्या आठव्या सत्रांची परीक्षा होणार नाही.

**इ) परीक्षा न घेता विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करण्याच्या पध्दतीबाबत:**

१) उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ मधील शिफारस क्र. १ नुसार **पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या** विद्यार्थ्यांना परीक्षा न देता त्यांचा विषयनिहाय निकाल हा प्रवेशित सत्रातील ५० टक्के अंतर्गत मुल्यमापनावर (Continuous Assessment - CA) आणि ५० टक्के लगतच्या पुर्वीच्या सत्रातील परीक्षांच्या गुणांच्या (University Assessment - UA) आधारे जाहिर करण्यात येईल.

२) वरील मुद्दा क्र. इ (१) नुसार अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांना मिळणारी श्रेणी ही ५० टक्के अंतर्गत गुणांवर आधारीत व ५० टक्के लगतच्या पुर्वीच्या सत्रातील परीक्षांच्या गुणांवर आधारीत असेल. त्यानुसार विविध परीक्षा पध्दतींच्या विविध परीक्षांसाठी मुल्यमापनाचे सूत्र पुढील प्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) ४० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ६० गुण असतील अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील.

$$\text{विषयाचे गुण} = \text{अंतर्गत गुण (४० पैकी)} + \left[ \frac{\text{अंतर्गत गुण x १०}}{\text{४०}} + \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x ५०}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २५ गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ७५ गुण असतील अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील.

$$\text{विषयाचे गुण} = \text{अंतर्गत गुण (२५ पैकी)} + \left[ \frac{\text{अंतर्गत गुण x २५}}{\text{२५}} + \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x ५०}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ८० गुण असतील अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील.

$$\text{विषयाचे गुण} = \text{अंतर्गत गुण (२० पैकी)} + \left[ \frac{\text{अंतर्गत गुण x ३०}}{\text{२०}} + \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x ५०}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २० गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) ३० गुण असतील अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील.

$$\text{विषयाचे गुण} = \text{अंतर्गत गुण (२० पैकी)} + \left[ \frac{\text{अंतर्गत गुण x ०५}}{\text{२०}} + \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x २५}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस अंतर्गत (Internal) २५ गुण व बहि:स्थ परीक्षेस (External) २५ गुण असतील अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील.

$$\text{विषयाचे गुण} = \text{अंतर्गत गुण (२५ पैकी)} + \left[ \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x २५}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

- ज्या अभ्यासक्रमाच्या सत्र परीक्षेस फक्त "X" मार्कांची बहि:स्थ परीक्षा (External) असेल अशा अभ्यासक्रमांच्या विषयांचे गुण खालील सूत्रानुसार जाहिर करण्यात येतील. (व्दितीय वर्ष कला, विज्ञान व वाणिज्य या वर्गांच्या General Knowledge विषया करीता सुध्दा)

$$\text{विषयाचे गुण} = \left[ \frac{\text{लगतच्या सत्रातील एकूण प्राप्त गुण x ``X''}}{\text{लगतच्या सत्राचे एकूण गुण}} \right]$$

३) अध्यादेश ६७ नुसार उन्हाळी २०२० परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना Mercy Chance/संधी मान्य करण्यात आलेली आहे, त्यांना देण्यात आलेली संधी ग्राह्य धरून माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेत संधी देण्यात येईल.

४) अध्यादेश १७४ नुसार श्रेणी/गुणवत्ता सुधार करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा उन्हाळी २०२० च्या परीक्षेच्या वेळी न घेता, त्यांना देण्यात आलेली संधी ग्राह्य धरून माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२० मध्ये होणाऱ्या परीक्षेत संधी देण्यात येईल.

५) जे विद्यार्थी संदर्भ क्र. २ मध्ये दर्शविलेल्या पत्रातील शिफारस (१) प्रमाणे मुल्यामापन केल्यानंतरही अनुत्तीर्ण होतील किंवा उत्तीर्ण होऊन मिळालेल्या गुणांवर समाधानी नसतील, अशा विद्यार्थ्यांसाठी पुढील शैक्षणिक वर्षात नियमीत सत्र परीक्षेच्या वेळी नियमानुसार परीक्षा अर्ज भरुन आपले अनुशेष विषय व आपली श्रेणी सुधारणा करण्याची संधी मिळेल.

६) वरीलप्रमाणे गुण निश्चित करतांना जर एखाद्या विद्यार्थ्यांचे गुण अपुर्णांकांत येत असल्यास त्याचे रूपांतर दशांशाच्या पुढे ५० किंवा अधिक असल्यास पुढील पुर्णांकात व दशांशाच्या पुढे ५० पेक्षा कमी असल्यास मागील पुर्णांकात घ्यावे. उदा. ३९.४९ किंवा त्यापेक्षा कमी असेल तर ३९ घ्यावे व ३९.५० किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर ४० घ्यावे.

**ई) पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेशाबाबत (Carry Forward) :**

१) संदर्भ क्र. २ मधील शिफारस क्र. अ-१ (i) अनुसार अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमातील विषयांमध्ये अनुत्तीर्ण असलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात/ सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजण्यात येतील.

२) सदर तरतुद ही केवळ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठीच असेल.

३) अशा सर्व विद्यार्थ्यांनी ते गैरहजर असणाऱ्या किंवा अनुत्तीर्ण झालेल्या विषयांच्या परीक्षांचे जेव्हा आयोजन होईल, तेव्हा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४) ज्या विद्यार्थ्यांची अनुशेष (Backlog) असतील, अशा सर्व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरी फॉरवर्डच्या पध्दतीनुसार सदर विद्यार्थी पुढील सत्रात किंवा पुढीच्या वर्षात प्रवेश करेल. परंतु असे सर्व अनुशेष विषयाची परीक्षा पुढील शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर नियमीत सत्राच्या वेळी घेण्यात येईल.

**उ) इतर तरतुदींबाबत :**

१) पीएच.डी. व एम.फील च्या विद्यार्थ्यांचा टाळेबंदीमुळे राहिलेली प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. २ प्रमाणे मुदत वाढ देण्यात येईल व ऑनलाईन व्दारे मौखिक परीक्षा घेण्याची तयारी करण्यात येईल.

२) बहि:स्थ शिक्षण व अध्ययन विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी, संचालक, बहि:स्थ शिक्षण व अध्ययन विभाग (DEEL) हे त्यांच्या परीक्षांबाबत स्वतंत्रपणे परिपत्रक जाहिर करतील.

३) यापुर्वी विद्यापीठाने निर्गमित केलेले पत्र क्र. कबचौउमवि/२/कोरोना (कोव्हीड-१९)/१९०/२०२०, दि. १४.०५.२०२० अन्वये सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी जेथे आवश्यक आहे तेथे उपर्निदिष्ट मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, सर्व विद्यार्थ्यांना समान संधीची उपलब्धता आणि परीक्षेची गुणवत्ता राखली जाईल यांची काळजी घेण्याबाबत कळविले असले, तरी संबंधीत महाविद्यालयांनी परीक्षेत एकरूपता येण्यासाठी या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

४) तसेच परीक्षेच्या निकाला बाबत परीक्षेच्या संदर्भातील विद्यापीठाचे यापुर्वीचे अध्यादेश जसेच्या तसे लागू राहतील.

उपरोक्त सर्व नमूद बाबींना अनुसरून निकाल जाहिर करणे व पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेशाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

Bhatuprasad Prabhakar Patil

Digitally signed by Bhatuprasad Prabhakar Patil
DN: c=IN, o=Kavayitri Bahinabai Chaudhari North Mh. University, ou=Director Board of Examinations and Evaluation, cn=Bhatuprasad Prabhakar Patil, serialNumber=1c9f78a35972bc358358c30906be0f2f7473da51a8fe8bf8b5ca214dbfe20483, postalCode=425001, 2.5.4.20=503f3136f4b51bc2496a33245787fa1b54e7924915585cb1e82e24ec8c0baf75, st=Maharashtra
Date: 2020.06.11 13:25:48 +05'30'

**(भ.प्र. पाटील)**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.:कबचौउमवि/७-अ/कोव्हीड-१९/उन्हाळी परीक्षा/१६७१/२०२०
दिनांक : ११.०६.२०२०
प्रत :

१) विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यायांचे मा. प्राचार्य व परिसंस्थांचे मा. संचालक.
२) सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक/विभाग प्रमुख, कबचौउमवि, जळगाव.
३) पध्दती विश्लेषक/विशेष कार्य अधिकारी, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
४) उपकुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
५) सहा. कुलसचिव/कक्ष अधिकारी, गोपनीय (पूर्वार्ध / उत्तरार्ध), परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
६) सहा. कुलसचिव/कक्ष अधिकारी - कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शाखा, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, कबचौउमवि, जळगाव.
७) समन्वयक, ई-सुविधा कक्ष, कबचौउमवि, जळगाव.
८) जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.